"गोड मुलांनो - हा भुल-भुलैयाचा खेळ आहे तुम्ही वारंवार बाबांना विसरून जाता, निश्चय-बुद्धी बना तेव्हाच तुम्ही या खेळामध्ये अडकणार नाही"

प्रश्न:- कयामतच्या (महाविनाशाच्या) वेळेला पाहत असताना तुम्हा मुलांचे कोणते कर्तव्य आहे?

उत्तर:- तुमचे कर्तव्य आहे - चांगल्या रीतीने आपल्या अभ्यासाला लागणे, इतर गोष्टींमध्ये जायचे नाही. बाबा तुम्हाला डोळ्यांच्या पापण्यांवर बसवून, गळ्यातील हार बनवून सोबत घेऊन जातील. बाकीच्या सर्वांना तर आपला-आपला हिशोब चुकता करून जायचेच आहे. बाबा आले आहेत सर्वांना आपल्या सोबत घरी घेऊन जाण्याकरिता.

गीत:- दूर देश का रहने वाला…

ओम् शांती. रुहानी बाबा रुहानी मुलांना बसून समजावून सांगत आहेत - भारत खास आणि आम दुनिया सर्वांना विश्वामध्ये शांती हवी आहे. आता हे तर समजले पाहिजे - जरूर विश्वाचे मालकच विश्वामध्ये शांती स्थापन करतात. गॉडफादरलाच बोलावले पाहिजे की येऊन विश्वामध्ये शांती पसरवा. कोणाला बोलवावे ते देखील बिचाऱ्यांना ठाऊक नाही आहे. साऱ्या विश्वाची गोष्ट आहे ना. साऱ्या विश्वामध्ये शांती हवी आहे. आता शांतीचे धाम तर वेगळे आहे, जिथे बाबा आणि तुम्ही आत्मे राहता. हे देखील बेहदचे बाबाच समजावून सांगतात. आता या दुनियेमध्ये तर असंख्य मनुष्य आहेत, अनेक धर्म आहेत. म्हणतात - एक धर्म असावा तर शांती होईल. सर्व धर्म काही एकत्र येऊन एक होऊ शकत नाहीत. त्रिमूर्तीची महिमा देखील आहे. त्रिमूर्तीची चित्रे खूप ठेवतात. हे देखील जाणतात ब्रह्मा द्वारे स्थापना. कशाची? केवळ शांतीची थोडीच होईल. शांती आणि सुखाची स्थापना होते. या भारतामध्येच ५ हजार वर्षांपूर्वी जेव्हा यांचे राज्य होते तर जरूर बाकी सर्व जीव आत्मे, शरीराला सोडून आपल्या घरी गेले असतील. आता हवा आहे एक धर्म, एक राज्य, एक भाषा. आता तुम्ही मुले जाणता - बाबा सुख, शांती, संपत्तीची स्थापना करत आहेत. एक राज्य देखील जरूर इथेच असेल ना. एका राज्याची स्थापना होत आहे - ही काही नवीन गोष्ट नाहीये. अनेकदा एक राज्य स्थापन झाले आहे. मग अनेक धर्मांची वृद्धी होत-होत, झाड मोठे होते मग बाबांना यावे लागते. आत्माच ऐकते, शिकते, आत्म्यामध्येच संस्कार आहेत. आपण आत्मे भिन्न-भिन्न शरीर धारण करतो. मुलांना असे निश्चय-बुद्धी होण्यामध्ये देखील खूप मेहनत करावी लागते. म्हणतात - 'बाबा, घडोघडी आठवण विसरायला होते'. बाबा म्हणतात - हा भुल-भुलैयाचा खेळ आहे. यामध्ये तुम्ही जसे काही अडकून पडले आहात, माहित नाही आहे आपण आपल्या घरी किंवा राजधानीमध्ये कसे जाणार. आता बाबांनी समजावून सांगितले आहे या अगोदर काहीच ठाऊक नव्हते. आत्मा किती पत्थर-बुद्धी बनते. पत्थर-बुद्धी आणि पारस-बुद्धीचे भारतामध्येच गायन आहे. पत्थर-बुद्धी राजे आणि पारस-बुद्धी राजे इथेच आहेत. पारसनाथचे मंदिर देखील आहे. आता तुम्ही जाणता आपण आत्मे पार्ट बजावण्याकरिता कुठून आलो आहोत. पहिले तर काहीच जाणत नव्हतो. याला म्हटले जाते काट्यांचे जंगल. ही सारी दुनिया काट्यांचे जंगल आहे. फुलांच्या बगीच्याला आग लागली, असे कधी ऐकले नसेल. नेहमी जंगलाला आग लागते. हे देखील जंगल आहे, याला आग जरूर लागणार आहे. भंभोरला आग लागणार आहे. या जुन्या दुनियेलाच भंभोर म्हटले जाते. आता तुम्हा मुलांनी बाबांना जाणले आहे. सन्मुख बसला आहात. जे गात होता - 'तुम्हीं से बैठूँ…' ते सर्व काही आता प्रत्यक्षात सुरू आहे. भगवानुवाच तर जरूर शिकाल ना. भगवानुवाच मुलांप्रतीच असेल ना. तुम्ही जाणता भगवान शिकवत आहेत. भगवान कोण आहेत? निराकार शिवनाच भगवान म्हणणार. भगवान शिवाची पूजा देखील इथेच होते. सतयुगामध्ये पूजा इत्यादी होत नाही. आठवण सुद्धा करत नाहीत. भक्तांना सतयुगाच्या राजधानीचे फळ मिळते. तुम्ही समजता सर्वात जास्त भक्ती आपण केली आहे. म्हणून सर्वात पहिले आपणच बाबांकडे आलो आहोत. मग आपणच राजधानीमध्ये येणार. तर मुलांनी पूर्ण पुरुषार्थ केला पाहिजे - नवीन दुनियेमध्ये उच्च पद प्राप्त करण्याकरिता. मुलांना मनातून वाटते आता आपण लवकर नवीन घरी जावे. सुरुवातीलाच नवीन घर असेल मग जुने होत जाईल. घरात मुलांची वृद्धी होत जाईल. मुले, नातवंडे, पतवंडे जुन्या घरी तर येतील ना; म्हणतील - आमच्या आजोबा, पणजोबांचे हे घर आहे. नंतर येणारे देखील खूप असतात ना. जितका जोरदारपणे पुरुषार्थ

कराल तितके नवीन घरामध्ये याल. पुरुषार्थाची खूप सोपी युक्ती बाबा समजावून सांगतात. भक्तीमध्ये देखील पुरुषार्थ करतात ना. खूप भक्ती करणाऱ्यांचे नाव प्रसिद्ध होते. कितीतरी भक्तांचे स्टॅम्प (पोस्टाची तिकिटे) देखील काढतात. ज्ञानाच्या माळेबद्दल तर कोणालाच माहित नाहीये. पहिले आहे ज्ञान, नंतर आहे भक्ती. हे तुम्हा मुलांच्याच बुद्धीमध्ये आहे. अर्धा काळ आहे ज्ञान - सतयुग-त्रेता. आता तुम्ही मुले नॉलेजफुल बनत जाता. टीचर नेहमी फुल नॉलेजवाले (संपूर्ण ज्ञानी) असतात. स्टुडंट नंबरवार मार्क मिळवतात. हे आहेत बेहदचे टीचर. तुम्ही आहात बेहदचे स्टुडंट, स्टुडंट तर क्रमवारीनेच पास होतील. जसे कल्पापूर्वी झाले आहेत. बाबा समजावून सांगत आहेत - तुम्हीच ८४ जन्म घेतले आहेत. ८४ जन्मांमध्ये ८४ टीचर असतात. पुनर्जन्म तर जरूर घ्यायचाच आहे. पहिली जरूर सतोप्रधान दुनिया असते, नंतर मग जुनी तमोप्रधान दुनिया होते. मनुष्य देखील तमोप्रधान असतील ना. झाड देखील पहिले नवीन सतोप्रधान असते. नवीन पाने खूप चांगली-चांगली असतात. हे तर बेहदचे झाड आहे. असंख्य धर्म आहेत. तुमची बुद्धी आता बेहदकडे जाईल. किती मोठे झाड आहे. सर्वप्रथम आदि सनातन देवी-देवता धर्मच असेल. नंतर मग व्हरायटी धर्म (इतर धर्म) येतील. तुम्हीच ८४ व्हरायटी जन्म घेतले आहेत. ते देखील अविनाशी आहेत. तुम्ही जाणता - आपण कल्प-कल्प ८४ चे चक्र फिरत राहतो. ८४ च्या चक्रामध्ये आपणच येतो. ८४ लाख जन्म काही मनुष्याची आत्मा घेत नाही. ते तर व्हरायटी पशु-पक्षी इत्यादी अनेक आहेत. त्यांची मोजदाद सुद्धा कोणी करू शकत नाही. मनुष्याच्या आत्म्यांनीच ८४ जन्म घेतले आहेत. तर हा पार्ट बजावता-बजावता एकदम जसे थकले आहेत. दुःखी झाले आहेत. शिडी उतरत सतोप्रधानापासून तमोप्रधान बनले आहेत. आता पुन्हा बाबा तमोप्रधानापासून सतोप्रधान बनवत आहेत. बाबा म्हणतात - मी तमोप्रधान शरीरामध्ये, तमोप्रधान दुनियेमध्ये आलो आहे. आता सारी दुनिया तमोप्रधान आहे. मनुष्य तर असे म्हणतात - साऱ्या विश्वामध्ये शांती कशी होईल. हे समजत नाहीत की विश्वामध्ये शांती कधी होती. बाबा म्हणतात - तुमच्या घरी चित्रे तर ठेवली आहेत ना. यांचे राज्य होते - तर साऱ्या विश्वामध्ये शांती होती, त्याला स्वर्ग म्हटले जाते. नवीन दुनियेलाच हेवन, गोल्डन एजेड म्हटले जाते. आता ही जुनी दुनिया बदलणार आहे. ती राजधानी स्थापन होत आहे. विश्वामध्ये राज्य तर यांचेच होते. लक्ष्मी-नारायणाच्या मंदिरामध्ये पुष्कळ लोक जातात. हे थोडेच कोणाच्या बुद्धीमध्ये आहे की, हेच भारताचे मालक होते, यांच्या राज्यामध्ये जरूर सुख-शांती होती. ५ हजार वर्षांची गोष्ट आहे - जेव्हा यांचे राज्य होते. अर्ध्या कल्पानंतर जुनी दुनिया म्हटले जाते, म्हणून व्यापारी लोक खाते पुस्तकावर स्वस्तिक काढतात. त्याचा देखील अर्थ आहे ना. ते तर त्याला गणेश म्हणतात. गणेशाला मग विघ्न विनाशक देवता समजतात. स्वस्तिकामध्ये पूर्ण चार भाग असतात. हा सर्व आहे भक्तिमार्ग. आता दिवाळी साजरी करतात, वास्तविक खरी-खुरी दिवाळी आठवणीची यात्राच आहे ज्याद्वारे आत्म्याची ज्योत २१ जन्मांसाठी जागृत होते. खूप कमाई होते. तुम्हा मुलांना खूप आनंद झाला पाहिजे. आता तुमचे नवीन खाते सुरू होते - नवीन दुनिये करिता. २१ जन्मांकरिता आता खाते जमा करायचे आहे. आता बाबा मुलांना सांगत आहेत, स्वतःला आत्मा समजून ऐकत आहात. आत्मा समजून ऐकाल तर आनंदी देखील रहाल. बाबा आपल्याला शिकवत आहेत. भगवानुवाच देखील आहे ना. भगवान तर एकच आहेत. जरूर ते येऊन शरीर धारण करत असतील, तेव्हाच 'भगवानुवाच' म्हटले जाते. हे देखील कोणाला माहित नाहीये, म्हणूनच 'नेती-नेती' म्हणत आले आहेत. म्हणतात देखील - ते परमपिता परमात्मा आहेत. आणि मग म्हणतात - आम्ही जाणत नाही. म्हणतात देखील - 'शिवबाबा', ब्रह्माला देखील 'बाबा' म्हणतात. विष्णूला कधी बाबा म्हणणार नाहीत. प्रजापिता तर बाबा झाले ना. तुम्ही आहात बी.के., 'प्रजापिता' नाव नसल्यामुळे समजत नाहीत. इतके असंख्य बी.के. आहेत तर जरूर प्रजापिताच असणार, म्हणून 'प्रजापिता' शब्द जरुर लिहा. तर समजतील प्रजापिता तर आपलेच पिता आहेत. नवीन सृष्टी जरूर प्रजापित्याद्वारेच रचली जाते. आपण आत्मे भाऊ-भाऊ आहोत; मग शरीर धारण करून भाऊ-बहीणी बनतो. बाबांची मुले तर अविनाशी आहेत मग साकारमध्ये बहिण-भाऊ पाहिजेत. तर नाव आहे - 'प्रजापिता ब्रह्मा'. परंतु ब्रह्माची काही आपण आठवण करत नाही. आठवण लौकिकची करतो आणि पारलौकिकची करतो. प्रजापिता ब्रह्माची कोणी आठवण करत नाही. दुःखामध्ये पित्याची आठवण करतात, ब्रह्माची नाही. म्हणतील - 'हे भगवान'. 'हे ब्रह्मा', असे म्हणणार नाहीत. सुखामध्ये तर कोणाचीच आठवण करत नाहीत. तिथे सुखच सुख आहे. हे देखील कोणाला ठाऊक नाहीये. तुम्ही जाणता यावेळी आहेत - तीन पिता. भक्तीमार्गामध्ये लौकिक आणि पारलौकिक पित्याची आठवण करतात. सतयुगामध्ये फक्त लौकिक पित्याची आठवण करतात. संगमावर तिघांचीही आठवण करतात. लौकिक पिता देखील आहेत परंतु जाणतात ते आहेत हदचे पिता. त्यांच्याकडून हदचा वारसा मिळतो. आता आपल्याला बेहदचे बाबा मिळाले आहेत ज्यांच्याकडून बेहदचा वारसा मिळतो. ही समजून घेण्यासारखी गोष्ट आहे. आता बेहदचे बाबा आले आहेत ब्रह्माच्या तनामध्ये -

आम्हा मुलांना बेहदचे सुख देण्याकरिता. त्यांचे बनल्याने आपण बेहदचा वारसा प्राप्त करतो. हा जसा आजोबांचा वारसा मिळतो ब्रह्मा द्वारे; ते म्हणतात - तुम्हाला वारसा मी देतो. मी शिकवतो. ज्ञान माझ्याकडे आहे. बाकी ना मनुष्यांमध्ये ज्ञान आहे, ना देवतांमध्ये आहे. ज्ञान आहे माझ्याकडे. जे मी तुम्हा मुलांना देतो. हे आहे रूहानी ज्ञान.

तुम्ही जाणता रूहानी बाबांद्वारे आपल्याला हे पद मिळते. अशा प्रकारे विचार सागर मंथन केले पाहिजे. गायन आहे - 'मन के जीते जीत, मन से हारे हार…' वास्तविक म्हटले पाहिजे - 'मायेवर जीत', कारण मनाला काही जिंकता येत नाही. मनुष्य म्हणतात मनाला शांती कशी मिळेल? बाबा म्हणतात - आत्मा कशी म्हणेल की मनाला शांती पाहिजे. आत्मा तर आहेच शांतीधाममध्ये राहणारी. आत्मा जेव्हा शरीरामध्ये येते तेव्हा कार्य करु लागते. बाबा म्हणतात - 'तुम्ही आता स्वधर्मामध्ये स्थित व्हा, स्वतःला आत्मा समजा'. आत्म्याचा स्वधर्म आहे शांत. बाकी शांती कुठे शोधणार. यावर राणीच्या गळ्यातील हाराचा देखील दृष्टांत आहे. संन्यासी दृष्टांत देतात आणि मग स्वतः जंगलामध्ये जातात शांती शोधत राहतात. बाबा म्हणतात की, तुम्हा आत्म्यांचा स्वधर्मच शांती आहे. शांतीधाम तुमचे घर आहे, जिथून पार्ट बजावण्याकरिता तुम्ही येता. शरीराद्वारे मग कर्म करावे लागते. शरीरापासून वेगळे झाल्याने सन्नाटा होतो. आत्म्याने जाऊन दुसरे शरीर घेतले मग चिंता कशाला केली पाहिजे. ती परत थोडीच येईल. परंतु मोह सतावत राहतो. तिथे तुम्हाला मोह सतावणार नाही. तिथे ५ विकार असत नाहीत. रावण राज्यच नाहीये. ते आहे राम राज्य. नेहमी रावण राज्य असेल तर मग मनुष्य थकून जातील. कधीच सुख पाहू शकणार नाहीत. आता तुम्ही आस्तिक बनला आहात आणि त्रिकालदर्शी देखील बनला आहात. मनुष्य बाबांना जाणत नाहीत म्हणून नास्तिक म्हटले जाते.

आता तुम्ही मुले जाणता ही शास्त्र इत्यादी जी पास्ट होऊन गेली आहेत, हा सर्व आहे भक्तिमार्ग. आता तुम्ही आहात ज्ञान मार्गामध्ये. बाबा तुम्हा मुलांना किती प्रेमाने डोळ्यांच्या पापण्यांवर बसवून घेऊन जातात. गळ्यातील हार बनवून सर्वांना घेऊन जातो. बोलावतात देखील सगळेच ना. जे काम-चितेवर बसून काळे झाले आहेत त्यांना ज्ञान-चितेवर बसवून, हिशोब चुकता करून परत घेऊन जातो. आता तुमचे काम आहे शिकण्याशी, इतर गोष्टींमध्ये का गेले पाहिजे. कसे मरतील, काय होईल… या गोष्टींमध्ये आपण का जावे. ही तर कयामतची (महाविनाशाची) वेळ आहे, सगळे हिशोब चुकते करून परत निघून जातील. हे बेहदच्या ड्रामाचे रहस्य तुम्हा मुलांच्याच बुद्धीमध्ये आहे, इतर कोणीही जाणत नाही. मुले जाणतात आपण बाबांकडे बेहदचा वारसा घेण्याकरिता कल्प-कल्प येतो. आपण जीव-आत्मे आहोत. बाबांनी देखील देहामध्ये येऊन प्रवेश केला आहे. बाबा म्हणतात - 'मी साधारण तनामध्ये येतो, यांना (ब्रह्मा बाबांना) देखील बसून समजावून सांगतो की, तू आपल्या जन्मांना जाणत नाहीस'. इतर कोणीही असे म्हणू शकणार नाही की, 'मुलांनो, देही-अभिमानी बना, बाबांची आठवण करा'. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांशः-

१) आठवणीच्या यात्रेमध्ये राहून दररोज खरीखरी दिवाळी साजरी करायची आहे. आपले नवीन खाते २१ जन्मांकरिता जमा करायचे आहे.

२) ड्रामाच्या रहस्याला बुद्धीमध्ये ठेवून शिक्षणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टींमध्ये जायचे नाही. सर्व हिशोब चुकते करायचे आहेत.

वरदानः- रुहानियतच्या स्थिती द्वारे व्यर्थ गोष्टींचा स्टॉक नष्ट करणारे खुशीच्या खजिन्याने संपन्न भव

रूहानियतच्या शक्तीद्वारे व्यर्थ गोष्टींच्या स्टॉकला नष्ट करा, नाहीतर एकमेकांच्या अवगुणांचे वर्णन करत रोगाचे किटाणू वायूमंडळामध्ये पसरवत रहाल, यामुळे वातावरण पॉवरफुल बनणार नाही. तुमच्याकडे अनेक भावनेने अनेक आत्मे येतील परंतु त्यांनी तुमच्याकडून शुभ भावनेच्या गोष्टीच घेऊन जाव्यात. हे तेव्हा होईल जेव्हा स्वतःकडे खुशीच्या गोष्टींचा स्टॉक जमा असेल. जर

मनामध्ये कोणा प्रति कोणत्या व्यर्थ गोष्टी असतील तर जिथे गोष्टी आहेत तिथे बाबा नाहीत, पाप आहे.

बोधवाक्य:- स्मृतीचा स्विच ऑन असेल तर मूड ऑफ होऊ शकणार नाही.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा.

जितके जे बीझी आहेत, तितकाच त्यांनी मध्ये-मध्ये हा अभ्यास करणे गरजेचे आहे, म्हणजे मग सेवेमध्ये कधी-कधी जो थकवा येतो, कधी काही ना काही आपसामध्ये अशांतता निर्माण होते, ते होणार नाही. एका सेकंदामध्ये न्यारे होण्याचा अभ्यास असेल तर कोणतीही गोष्ट झाली तरी एका सेकंदामध्ये आपल्या अभ्यासाद्वारे या गोष्टींपासून दूर व्हाल. विचार केला आणि स्वरूप बनले. युद्ध करावे लागणार नाही.